# घरडा केमिकल्स लिमिटेड

## ऊर्जाविषयक धोरण

घरडा केमिकल्स लिमिटेड (जीसीएल) आपल्या कामकाजादरम्यान आपल्या सर्व कारखान्यांमध्ये आणि ठिकाणांवर ऊर्जेचा कार्यक्षम वापर करण्यासाठी आमच्या वचनबध्दतेच्या अनुषंगाने रिस्पॉन्सीबल केअर आणि शाश्वत विकासासाठी वचनबध्द आहे. आम्ही नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करणे, तसेच वातावरणातील उत्सर्जन आणि हवामान बदलाचे परिणाम कमी करणे यासाठी योगदान देण्यावर विश्वास ठेवतो.

अ. जीसीएल, कार्यक्षम तंत्रज्ञान व चांगल्या ऑपरेशनल आणि देखभाल पध्दतीद्वारे नैसर्गिक साधनसंपत्ती व ऊर्जेचे रक्षण आणि सर्वोत्तम वापर तसेच ऊर्जा स्त्रोतांच्या वापरामुळे वातावरणात होणारे ऊत्सर्जन, कमी करण्यासाठी वचनबध्द आहे.

ब. हे धोरण, जीसीएल त्यांच्या सर्व उत्पादने आणि सेवांमध्ये ऊर्जा कामगिरी सुधारण्यासाठी आणि संबंधित ऊर्जा स्त्रोत कमी करण्यासाठी ऊर्जा ऊद्दिष्टे निश्चीत करण्याकरीता आणि त्यांचे पुनरावलोकन करण्याकरीता एक फ्रेमवर्क म्हणून वापरेल.

क. निर्धारित उद्दिष्टे आणि ऊर्जा लक्ष्य साध्य करण्यासाठी जीसीएल व्यवस्थापन आवश्यक माहिती आणि साधनसंपत्तीच्या उपलब्धतेसाठी वचनबध्द आहे.

ड. जीसीएल ऊर्जा कार्यक्षमता, उपयोग आणि वापराशी संबंधित लागू असलेल्या कायदेशीर आणि इतर आवश्यकतांची पूर्तता करेल.

ई. ऊर्जा कार्यक्षमतेत सुधारण करण्यासाठी जीसीएल डिझाईन कामांना समर्थन देईल. उर्जा कार्यक्षमतेवर परिणाम करणाऱ्या ऊर्जा कार्यक्षम उत्पादने आणि सेवांच्या खरेदीला जीसीएल पाठिंबा देईल तसेच नूतनीकरण करण्यासयोग्य ऊर्जेच्या वापरास प्रोत्साहन देईल.

फ. सर्व भागधारकांमध्ये अधिक जागरूकता वाढविण्यासाठी जीसीएल त्यांना ऊर्जेचा वापर त्यांच्याशी संबंधित हरितगृह वायू उत्सर्जन आणि हाती घेतलेल्या सुधारणा यासंबंधी विश्वसनीय माहिती प्रदान करेल.

ग. जीसीएल ऊर्जा कार्यप्रदर्शन आणि ऊर्जा व्यवस्थापन प्रणालीमध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी वचनबध्द असेल.

ह. ऊर्जा संवर्धनासाठी जीसीएल कर्मचारी आणि कंत्राटदारांचे प्रशिक्षण आणि विकास याबाबतची खात्री करेल. नियमित ऑडिटसह ऊर्जा कामगिरीचे निरीक्षण करण्यासाठी ऊर्जा व्यवस्थापन सेल आणि ऊर्जा व्यवस्थापन कक्ष स्थापन केल्याची खात्री करेल.

हे धोरण घरडा केमिकल्स लिमिटेड व तिच्या उपकंपन्यांना लागू आहे आणि उपयुक्ततेसाठी तसेच परिणामकारकतेसाठी त्याचे वेळोवेळी पुनरावलोकन केले जाईल.

दिवाकर के. शेणॉय रिव्हीजन नं.०२ दिनांकः ०१.०८.२०२३
डायरेक्टर – फॅक्टरी ऑपरेशन्स

**टीपः हा ऊर्जाविषयक धोरणाचा स्वैर मराठी अनुवाद असून काही कायदेशीर वाद निर्माण झाल्यास मुळ इंग्रजी प्रत ग्राह्य धरण्यात येईल.**